ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २ सप्टेंबर, १९५९ | अंक ३५

## विविध माहिती

**पोलाद कारखान्यांचें उत्पादन**—भिलई आणि रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतून चालू वर्षअखेर शुद्ध पोलादाचें उत्पादन होऊं लागेल. त्या सुमारास पांच झोतभट्ट्या उत्पादन करूं लागतील. त्यापैकी प्रत्येकीं दोन भिलई व रुरकेला येथें व पांचवी दुर्गापूर येथें सुरू होईल. येत्या कांहीं महिन्यांत देशांतील पोलादाच्या पुरवठ्यांत सुधारणा होईल असा अंदाज आहे.

**अधिक धान्य पिकाविण्याचे प्रयत्न**—ओरिसा सरकारनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेची पूर्वतयारी म्हणून राज्यांतील राष्ट्रीय विस्तार योजनेखाली असलेल्या जमिनींची रासायनिक पहाणी करण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांना निरनिराळ्या प्रकारच्या खतांचें महत्त्व पटवून देण्याचे प्रयत्नहि जोरानें करण्यांत येणार आहेत.

**मध्यप्रदेशांतील वीज–पुरवठा**—मध्यप्रदेश सरकारच्या मध्यवर्ती वीज–कमिशननें राज्यांतील वीज–पुरवठ्याच्या पांच योजनांचा अभ्यास करण्याचें ठरविलें आहे. ह्या सर्व योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यापैकी नर्मदा नदीवरील योजनेची पहाणी पुरी होत आली आहे.

**पाकिस्तानांतील किंमती वाढल्या**—लोकांना हरघडीं लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती पाकिस्तानांत झापाट्यानें वाढत आहेत. त्यांच्या किंमतीवरील नियंत्रणें नुकतींच रद्द करण्यांत आलीं आहेत. परदेशी बनावटीचीं दाढीचीं पातीं, प्रसाधनाची पावडर, चॉकोलेट, इत्यादि वस्तूंच्या किंमती ६८ ते १०० टक्क्यांनीं चढल्या आहेत. गेल्या नोव्हेंबरमध्यें पाकिस्तानांत लष्करी कायदा अंमलांत आल्यानंतर त्यांच्या किंमती एकदम घसरल्या व त्याचा फायदा लोकांनीं पुरेपूर घेतला.

**घरकाम करणारे नोकर**—घरकाम करणाऱ्या नोकरांच्या कामाच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणारें एक खाजगी बिल राज्यसभेमध्यें मांडण्यांत आलें आहे. बिलांत नोकरांची नोंदणी, त्यांचे पगार, त्यांच्या सुट्ट्या, इत्यादि बाबींबद्दल नियंत्रण घालण्याची व्यवस्था आहे. १८ वर्षांखालील नोकराला किमान ३० रुपये व त्यापेक्षा अधिक वयाच्या नोकराला किमान ४० रुपये देण्यासंबंधीं कलम बिलांत आहे.

**कागदाचा सहकारी कारखाना**—पाटण समाजविकास योजनेतर्फें कोयनानगर येथें हातबनावटीचा कागद तयार करण्याचा सहकारी तत्त्वावर चालणारा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याच्या ८० पुरस्कर्त्यांनीं ६,००० रुपये जमविले असून मुंबई सरकारच्या उद्योग–खात्यानें तेवढीच रक्कम देण्याचें कबूल केलें आहे. खादी व ग्रामोद्योग कमिशनकडून ६०,००० रुपये मिळणार असल्याची वार्ता आहे.

**आंध्रमधील जहागिरदारांना नुकसानभरपाई**—आंध्र भागांतील जहागिरदारांना त्यांच्या जमिनींची नुकसानभरपाई म्हणून एकूण सात कोटी रुपये देण्याचें आंध्र राज्य सरकारनें ठरविलें आहे. त्यांपैकी २॥ कोटी रुपयांची रक्कम त्यांना नुकतीच देण्यांत आली. ही नुकसानभरपाई एजन्सी एरिआज ह्या नांवानें संबोधल्या जाणाऱ्या भागापुरतीच आहे.

**स्वस्त रेडिओची परवाना फी**—स्वस्त किंमतीच्या रेडिओ सेट्ससाठी द्यावी लागणारी वार्षिक परवाना–फी १५ रुपयांऐवजीं ७॥ रुपये असावी अशी एक सूचना सरकारपुढें विचारासाठी आहे. पण त्याबद्दल अद्याप कोणताहि निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. एकापेक्षा अधिक रेडिओ सेट्स वापरणाऱ्याला परवाना-फीच्या बाबतींत सवलत देण्यासंबंधींहि विचार चालू आहे.

**स्कूटर्स मिळण्याबाबत अडचणी**—परदेशीय चलनाची चणचण असल्यामुळें भारतांत स्कूटर्स मिळण्याच्या कामीं अडचणी भासत आहेत स्कूटर्सचे कांहीं भाग परदेशांतून आणावे लागतात. स्कूटर्ससाठी लागणारे सुटे भाग आयात करतां यावे म्हणून धंद्याला लागणाऱ्या परदेशीय चलनांत चालू परवाना काळांत वाढ करण्यांत आली आहे.

**जपान काजूगरांची आयात करणार**—चालू वर्षी जपान भारताकडून दोन लाख डॉलर्स किंमतीचे काजूगर आयात करणार आहे. टोकिओ येथील भारतीय वकिलातीनें केलेल्या प्रयत्नांचें हें फळ आहे ह्या वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत जपाननें भारताकडून १,२०० हंड्रेडवेट वजनाचे काजूगर आयात केले आहेत. निर्यात वाढविण्यासाठी ह्यासंबंधींचें एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल खास प्रयत्न करीत आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### विगरतिकीट रेल्वे प्रवासाचें अर्थशास्त्र

"रेल्वेच्या प्रत्येकीं वीस उतारूंपैकीं एक उतारू तिकीट न काढतां प्रवास करणारा असतो. त्यामुळें वार्षिक ५ कोटी रुपयांचें नुकसान होतें. फुकट्या प्रवाशांना अडवण्यासाठीं सर्व रेल्वेजवर मिळून १२,७०० लोक नेमलेले आहेत, आणि त्यांचेवर दरसाल २·३ कोटी रुपये खर्च होतो. रेल्वे नोकर विगरतिकीट उतारूंचे-कडे दुर्लक्ष करतात, इतकेंच नव्हे तर त्यांना सुखरूप फाटकाबाहेर पोचवतात."

—रेल्वेजचे उपमंत्री, श्री. शहानवाझ खान ह्यांचें भाषण.

### सरकारी अशोक हॉटेलची शोककथा

सरकारनें चालविलेल्या, दिल्ली येथील अशोक हॉटेलला १९५७–५८ मध्यें १५,७६,८७६ रु. तोटा आला. १९५६–५७ मधील तोटा २७,७६,१२२ रु. होता. चालू वर्षी ह्याहिपेक्षा कमी तोटा येईल, अशी हॉटेलच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची अपेक्षा आहे. कारण, हॉटेलची लोकप्रियता वाढत आहे आणि चालकांनीं खर्चातहि काटकसर केली आहे. सरकारनें हॉटेलला ५० लक्ष रुपयांचें कर्ज दिलें होतें. त्याचें १ जुलै रोजीपासून शेअर भांडवलांत रूपांतर करण्यांत आलें आहे. त्यामुळें, हॉटेलच्या कर्जाची रक्कम १,३५,३०,००० रुपयांवर उतरली आहे.

### आकाशवाणीवर 'पडसाद'

श्री. श्री. वा. काळे, ह्यांच्या पडसाद मालिकेंतील चवथी श्रुतिका बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजीं व पांचवी श्रुतिका दि. १६ सप्टेंबर रोजीं पुणें नभोवाणीवर 'गृहिणी' मध्यें ध्वनिक्षेपित होईल.

### लॉर्ड कॅटो ह्यांचा मृत्यु

ऑफिस बॉय म्हणून प्रथम नोकरीस लागलेले आणि पुढें बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर बनलेले लॉर्ड कॅटो हे २३ ऑगस्ट रोजीं आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यु पावले. १९४४ ते १९४९ ते बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर होते. त्यांची उंची फक्त पांच फूट होती. पहिल्या नोकरीचे वेळीं त्यांना मालकानें प्रश्न विचारला, "भिंतीवर लावलेल्या टेलिफोनपर्यंत तुझं तोंड पोचेल का?" तेव्हां त्यानें उत्तर दिलें, 'पायाखालीं खुर्ची घेईन, की!"

### "मँचेस्टर गार्डियन"चें "गार्डियन" मध्यें रूपांतर

ग्रेटब्रिटनमधील एक अत्यंत वजनदार व आंतरराष्ट्रीय मान्यतेचें वृत्तपत्र, दि मँचेस्टर गार्डियन, ह्याचें नांव २४ ऑगस्टपासून 'दि गार्डियन' असें बदलण्यांत आलें आहे. ह्या नामांतरामुळें वृत्तपत्राच्या धोरणांत फरक पडणार नाहीं; फक्त परिस्थितीमधील बदलाची दखल घेतली गेली आहे. १९३९ मध्यें, मँचेस्टर गार्डियनच्या ५२,००० च्या खपापैकीं फक्त २०,००० प्रती मँचेस्टरच्यापासून २० मैलांपेक्षा दूरच्या ठिकाणीं खपत होत्या. आतांच्या १,८३,००० खपापैकीं १,१८,००० प्रती दूरच्या ठिकाणींच खपतात व वाचल्या जातात. मि. सी. पी. स्कॉट हे मँचेस्टर गार्डियनचे १८७२–१९२९ (५७ वर्षें) संपादक होते.

### होमगार्ड व त्यांवरील खर्च

मुंबई राज्यांत एकूण १६,९१० होमगार्ड असून त्यांवर दरसाल १३,७१,५२० रु. खर्च होतो.

### "शिवतीर्थ"

राणी सरस्वती कन्या शाळा, सांगली, येथील चित्रकलेचे शिक्षक, श्री. दिगंबर श्रीपाद खापरे, ह्यांनीं रंगविलेलीं ६० चित्रें मुंबई सरकारनें खरेदी केलीं आहेत. ह्या चित्रांत शिवाजी महाराजांच्याशीं संबंधित अशा १३ ऐतिहासिक किल्ल्यांचीं दृश्यें आहेत.

### ट्रे. सेव्हिंग सर्टिफिकिटें : वारस नियुक्त करण्याचा अधिकार

दहा वर्षे मुदतीचीं ट्रेझरी सेव्हिंग डिपॉझिट सर्टिफिकिटें व पंधरा वर्षे मुदतीचीं ॲन्युइटी सर्टिफिकिटें धारण करणारांना त्यांच्या मृत्यूनंतर कोणास रक्कम मिळावी हें लिहून ठेवण्याचा (वारस नियुक्त करण्याचा) अधिकार देणारें बिल लोकसभेंत अर्थमंत्र्यांनीं मांडलें आहे. सध्यां, ५,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या सर्टिफिकेटांचे बाबतींत रिझर्व्ह बँक वारसा सर्टिफिकेटाची मागणी करते. वारसदाराला कायदेशीर पुरावा देणें पुष्कळ वेळां कठीण जातें व रक्कम मिळूं शकत नाहीं. ह्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती करण्यांत येत आहे.

---

**राजकोट तात्पुरती राजधानी**— मुंबई राज्याचें विभाजन करून महागुजरात राज्य निर्माण करण्यांत आल्यास नव्या राज्याची तात्पुरती राजधानी राजकोटला ठेवण्यांत यावी, अशी मागणी सौराष्ट्रामधील काँग्रेसवाल्यांकडून करण्यांत येत आहे. राजकोट येथें राहण्यासाठीं जागा, कचेऱ्यांसाठीं जागा व विधिमंडळाच्या बैठकींसाठीं सभागृह असल्यानें ही मागणी करण्यांत येत आहे.

**वेरावळ येथें आर्टस् कॉलेज**—सोमनाथ ट्रस्टनें वेरावळ येथें पुढील वर्षापासून एक आर्टस कॉलेज चालूं करण्याचें ठरविलें आहे. गुजरात विद्यापीठाच्या एका कमिटीनें ह्या दृष्टीनें वेरावळला भेट दिली होती. वेरावळ म्युनिसिपालिटीनें कॉलेजसाठी ५०,००० रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें आहे. कॉलेजमध्यें संस्कृतच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देण्यांत येईल.

**ओरिसा राज्यांत वीज-निर्मिति केंद्रें**—येत्या नोव्हेंबर महिन्यांत ओरिसा राज्य सरकारनें दोन वीज-निर्मिति केंद्रांच्या बांधणीस सुरुवात करण्याचें ठरविलें आहे. दोन्ही केंद्रें बांधून पूर्ण होण्यास १९६२ साल उजाडेल असा अंदाज आहे. ओरिसामधील उद्योगधंद्यांच्या वाढीला वीजपुरवठ्याचा चांगला उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

**मध्यवर्ती सरकारच्या ग्वाल्हेरला कचेऱ्या**—मध्यप्रदेश राज्याच्या कचेऱ्या ग्वाल्हेरहून भोपाळला हलविण्यांत आल्यावर मध्यवर्ती सरकार आपल्या कांहीं कचेऱ्या ग्वाल्हेरला आणणार आहे. भोपाळ ही मध्यप्रदेशाची राजधानी झाल्यावर ग्वाल्हेरचें महत्त्व कमी होऊं लागलें होतें. सरकारच्या निर्णयामुळें ग्वाल्हेरचें महत्त्व थोडेंबहुत टिकून राहील.

**दिल्ली येथें फिल्म स्टुडिओ**—दिल्ली येथें एक सर्वांग-परिपूर्ण असा फिल्म स्टुडिओ काढण्यांत येणार आहे. मुंबईच्या एका कंपनीनें मेहेरोली नजीकच्या क्षयरोगाच्या इस्पितळाजवळ ३२,००० चौरस यार्डांची जमीन खरेदी केली असून कांहीं महिन्यांतच स्टुडिओच्या बांधकामाला प्रारंभ होईल. स्टुडिओचे चालक स्वतः चित्रपट काढतील व तो भाड्यानेंहि देतील.

# अर्थ

बुधवार, ता. २ सप्टेंबर, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## कृत्रिम रबराचा कारखाना निघण्याची शक्यता

मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपति श्री. तुळशीदास किलाचंद ब्रिटन व अमेरिकेच्या दौऱ्यावरून भारतांत परत आले आहेत. त्यांनीं आपल्या दौऱ्याविषयीं वृत्तपत्रप्रतिनिधींशीं बोलतांना सांगितलें कीं भारतांत कृत्रिम रबराचा कारखाना निघण्याची शक्यता आहे. ह्या कारखान्याला लागणारें आर्थिक साह्य ब्रिटन व अमेरिकेंतील खाजगी कारखानदार पुरवतील असा विश्वास बाळगण्यास हरकत नाहीं. कारखान्याच्या उभारणीसाठी १५ कोटी रु. भांडवल लागेल आणि तसा तो उभारण्यांत आल्यास भारतामधील अशा प्रकारचा तो पहिलाच कारखाना होईल. उभारणीसाठी सुमारें ७·५ कोटी रुपयांची प्रारंभीं गरज लागेल. हें सर्व भांडवल फायरस्टोन कंपनी आणि ब्रिटन व अमेरिकेंतील खाजगी मालकीच्या बँका ह्यांच्याकडून मिळण्यासारखें आहे. उरलेलें भांडवल देशांतच उभारलें जाईल. कारखाना उभारण्यासाठी फायरस्टोन कंपनीचें तांत्रिक साह्य घेण्यांत येईल. तो उत्तर प्रदेश राज्यांत बरेलीनजीक काढण्याचें घाटत आहे. कारखान्याचे नकाशे तयार असून त्यांना मध्यवर्ती सरकारची मान्यताच काय ती मिळावयाची आहे. कारखान्यांत उत्पादन सुरू झाल्यावर दरसाल १० कोटी रुपयांचें परदेशीय चलन वाचेल असा अंदाज आहे, असेंहि त्यांनीं सांगितलें. भारताच्या आर्थिक विकासाच्या योजना एकामागून एक पार पाडण्यांत येत आहेत. ह्या योजना पार पाडण्याच्या कामीं वाहतुकीच्या साधनांवर खूपच ताण पडलेला आहे. एकट्या रेल्वेकडून होणारी वाहतूक सर्व ताण सहन करूं शकत नाहीं. त्यामुळें रस्तावाहतुकीलाहि महत्त्वाचें स्थान आहे. मोटारींच्या टायर्स वगैरेंसाठी लागणारें रबर भारताला मोठ्या प्रमाणावर आयात करावें लागतें. त्यादृष्टीनें कारखान्याचें महत्त्व वादातीत आहे.

## अणुशक्तीच्या संहारक उपयोगाचा धोका

औद्योगिक दृष्ट्या व तांत्रिक दृष्ट्या आघाडीवर असलेल्या राष्ट्रांत अणुशक्तीचा संहारक उपयोग करण्याच्या बाबतींत स्पर्धा चाललेली आहे. ह्या स्पर्धेचा स्फोट तिसऱ्या महायुद्धांत होण्याची शक्यता असली तरी जगांतील लोकांना युद्धाचाच तेवढा धोका आहे असें नाहीं. अणुबॉम्बच्या प्रायोगिक स्फोटामुळेंहि मनुष्याचें जीवित धोक्यांत येत चाललें आहे. अमेरिकन कॉंग्रेसच्या अणुशक्ति कमिटीनें ह्यासंबंधीं ४२ पानांचा एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांत असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे कीं, गेल्या पांच वर्षांत अणुबॉम्बचे जे प्रायोगिक स्फोट करण्यांत आले तसेच ते पुन्हा चालू करण्यांत आले तर पृथ्वीच्या वातावरणांतील अणुविषार वाढेल; आणि त्याचा मनुष्याच्या शरीरावर विपरीत परिणाम होईल. अणुविषाराच्या प्रसरणाविषयीं आतांपर्यंत इतका तपशीलवार विचार करण्यांत आलेला नाहीं. ह्या विषयाच्या ३० तज्ज्ञांनीं पुरविलेल्या साधार माहितीवर अहवाल आधारण्यांत आलेला आहे. अणुबॉम्बच्या स्फोटामुळें जें विषारी वातावरण जगभर पसरतें त्याविषयीं अमेरिकन सरकारनें फाजील गुप्तपणा पाळूं नये आणि लोकांना जास्तींत जास्त माहिती पुरवावी अशी सूचना करण्यांत आली आहे. नैसर्गिक अणुस्फोटजन्य दूषित वातावरणाचा मनुष्यावर कांहीं परिणाम नेहमींच होत असतो. आजपर्यंत जे कृत्रिम अणुस्फोट करण्यांत आले त्यामुळें माणसावर होणारे परिणाम नैसर्गिक उत्सर्जनापेक्षा सापेक्षतया कमी आहेत असेंहि अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. अणुस्फोटक अस्त्रांच्या भूमिगत स्फोटानें हवा दूषित होणार नाहीं; परंतु, ह्या प्रयोगांत वापरण्यांत येणारीं अस्त्रें फार मोठीं असतां कामा नयेत. फार मोठ्या स्फोटक शक्तीचीं अस्त्रें भूमिगत प्रयोगांत वापरण्याच्या कामीं अजून खूप अडचणी आहेत असा अभिप्राय अहवालांत व्यक्त करण्यांत आला आहे.

## कॅमेरे तयार करण्याचा कारखाना निघणार

परदेशीय चलनाच्या अडचणीमुळें भारतामधील अनेक उद्योगधंद्यांना बिकट परिस्थितीला तोंड द्यावें लागतें. फोटोग्राफीचा धंदाहि ह्या गोष्टीला अपवाद नाहीं. कॅमेरे, त्याचे भाग, फोटो काढण्याचें इतर साहित्य, ह्यांच्या आयातीवर नियंत्रण घातल्यानें बऱ्याच जणांची कुचंबणा झाली आहे. आतां ही कुचंबणा लवकरच दूर होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. मुंबईच्या इंडिआ इंडस्ट्रीज ह्या कंपनीनें बॉक्स आगफा कॅमेरे व फोटो काढण्यासाठी लागणारा कागद तयार करणारा कारखाना बडोदा येथें काढण्याची तयारी चालविली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी जर्मन तंत्रज्ञ भारतांत येणार आहेत. कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादन करण्याच्या कामास लवकरच प्रारंभ होईल आणि चालू वर्ष संपण्यापूर्वीच माल लोकांना मिळूं लागेल अशी वार्ता आहे. कारखाना चालविण्याचें तांत्रिक ज्ञान हिंदी कामगारांना देण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे. फोटोग्राफस काढण्यासाठी लागणारा कागद भारतांत अद्याप तयार होत नाहीं. अर्थातच हा कारखाना ह्या क्षेत्रांत पहिलाच ठरणार आहे. फोटोग्राफीचा कागद तयार होऊं लागल्यावर भारताचें दरसाल सुमारें एक कोटि रुपयांचें परदेशीय चलन वाचेल. कारण, मग ह्या कागदाची आयात करण्याचें कारण पडणार नाहीं. ह्या कागदावर आयातीसंबंधीं नियंत्रणें घालण्यापूर्वीं फक्त अगफा कंपनीच दरसाल सुमारें ४५ लाख रुपये किंमतीचा कागद आयात करीत असे. त्याशिवाय इतरांकडून होणारी आयात वेगळीच. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री जर्मनीकडून आयात करण्यांत येणार आहे. यंत्रसामुग्रीसाठी लागणाऱ्या किंमतीइतकें भांडवल एक जर्मन कंपनी स्वतःच हिंदी कंपनीबरोबर कारखान्यांत गुंतविणार आहे.

**मुंबई-प्राग विमान वहातूक**—झेक सरकारनें मुंबई ते प्रागपर्यंत सुरू केलेल्या विमानवाहतुकीसाठी झेकोस्लोव्हाकिआचें टी. यू. १०४ हें विमान मुंबईत आलें आहे. मुंबईतील कांहीं निमंत्रितांना विमानांतून तासभर हिंडवून आणण्यांत आलें. हें विमान एका तासांत जामनगरला जाऊन मुंबईला परत आलें.

### एंजिनिअरिंगच्या मालाच्या निर्यातींत वाढ

हिंदमधून निर्यात करण्यांत येणाऱ्या एंजिनिअरिंगच्या मालांत समाधानकारक वाढ होत आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत ह्या मालाच्या निर्यातींत गेल्या वर्षाच्या ह्याच काळाच्या मानानें ४० लाख रुपये किंमतीची वाढ झालेली आहे. खुद्द निर्यातींत तर वाढ झाली आहेच, पण ज्या ज्या देशांना हा माल निर्यात करण्यांत येतो त्या त्या सर्व प्रमुख देशांनीं तुलनेनें अधिक माल घेतला आहे, हें ह्या वाढीचें विशेष उत्साहवर्धक लक्षण आहे. ह्यावरून एक गोष्ट सिद्ध होते. भारताच्या एंजिनिअरिंगच्या मालाचा दर्जा चांगला असल्यामुळें तो माल निरनिराळ्या बाजारपेठांतून आपलें बस्तान बसवूं लागल्याचाच हा पुरावा आहे असें समजण्यास हरकत नाहीं. तथापि, परदेशांच्या ह्याच प्रकारच्या मालाशीं भारताच्या मालाला अजूनहि स्पर्धा करावी लागते. एंजिनिअरिंगचा माल निर्यात करणाऱ्यांना जरूर त्या सवलती देण्यांत आल्या तर स्पर्धेशीं तोंड देऊनहि बाजारपेठ विस्तार पावण्यासारखी आहे. १९५८ च्या पहिल्या सहामाहींत भारतानें १·९३ कोटी रुपये किंमतीचा एंजिनिअरिंगचा माल निर्यात केला होता. चालू सालीं २·३४ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यांत आला. पश्चिम आशिआ, आग्नेय आशिआ, उत्तर व दक्षिण अमेरिका, आफ्रिका, युरोप, इत्यादि सर्वच बाजारपेठांतून पूर्वीच्या मानानें अधिक माल निर्यात करण्यांत आला आहे. भारतांतून निर्यात होणारा एंजिनिअरिंगचा माल विविध प्रकारचा आहे. त्यापैकीं कांहीं माल असा आहे. शिवण्याचीं यंत्रें, साखरेच्या व चहाच्या कारखान्याची यंत्रसामुग्री, लोखंड व पोलादाचा किरकोळ माल, ट्रॅक्टरचे सुटे भाग, हरीकेन कंदील, डिझेल एंजिनें, छत्र्या, हवामान सुखद राखण्याचे सेटस्, इत्यादि.

---

### बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची जरूरी नाहीं

लोकसभेंत बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याविषयीं एक बिनसरकारी ठराव मांडण्यांत आला होता. मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्याचे उपमंत्रि श्री. भगत ह्यांनीं ह्या ठरावाला विरोध करतांना असें सांगितलें कीं बँकांजवळील जो पैसा वापरांत नसल्यानें शिल्लक असतो, त्याचा उपयोग विकासाच्या योजनांसाठीं होण्यासारखा आहे असें कांहीं जण म्हणतात. बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्यानें हें शक्य होईल ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही कल्पना अतिशयोक्तीपूर्ण आहे. बँकांनीं केलेली पैशाची गुंतवणूक, सरकारी रोख्यांत घातलेली रक्कम, त्यांच्या जवळील देशीं व परदेशी बिलें इत्यादींच्या आंकड्यांचा विचार केला तर राष्ट्रीयीकरणाची कल्पना कशी बिनबुडाची आहे तें दिसून येईल. राष्ट्रीयीकरण केल्यानें बँकांची एकूण साधनसंपत्ति वाढेल हें म्हणणें खरें नाहीं. उलट त्यामुळें नवीन कारभारविषयक प्रश्न निर्माण होतील. मध्यम मुदतीचीं व दीर्घ मुदतीचीं कर्जे मिळण्यास सुलभ जावें असा जर राष्ट्रीयीकरणाची मागणी करण्यामागें हेतु असेल तर हें काम आयुर्विमा कॉर्पोरेशनकडून होण्यासारखें आहे. बँकांचें राष्ट्रीयीकरण केल्यानें वाढत्या किंमतींना व चलनवृद्धीला आळा बसेल हें म्हणणेंहि पटण्यासारखें नाहीं. महागाई व चलनवृद्धि ह्यांना इतर अनेक प्रकारचीं कारणें आहेत. राष्ट्रीयीकरणामुळें कर चुकविणें कठीण होईल असें म्हणण्यांत येतें. त्यांतहि फारसा अर्थ नाहीं. कारण, उत्पन्नावरील करावाबत जे नियम करण्यांत आलेले आहेत त्यांत बँकांच्या गिऱ्हाइकांच्या खात्यांची तपासणी करण्याची सोय ठेवण्यांत आलेली आहे त्याशिवाय रिझर्व्ह बँकेला सर्व बँकांचें नियमन करण्याची सत्ता व तपासणीचे अधिकार दिलेले आहेतच.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.

## व्यवस्थापकीय शिक्षणाचें महत्त्व

लेखक :—वाय्. ए. फाझलभॉय

[ भारत सरकारनें फोर्ड फाउंडेशनच्या आमंत्रणावरून एक अभ्यासमंडळ अमेरिकेंतील व्यवस्थापकीय शिक्षण या विषयाची पाहणी करण्यासाठी नुकतेंच पाठविलें होतें. या शिष्टमंडळाचे नेते म्हणून जाण्याचा मान महाराष्ट्र चेंबरच्या कार्यकारी मंडळाचे सभासद श्री. युसुफशेट फाझलभॉय यांना मिळाला होता. ]

आजकालच्या झपाट्यानें बदलणाऱ्या परिस्थितींत व्यवस्थापकीय शास्त्र ( Management Education ) चें महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे. व्यवस्थापकाकडे बघण्याचा पूर्वीचा दृष्टिकोन बदलतच आहे. पूर्वीप्रमाणें केवळ जुन्या माणसाला मिळणारी जागा असा व्यवस्थापकाबद्दलचा दृष्टिकोन आज संपूर्ण बदलला असून व्यवस्था पाहणें हा एक स्वतंत्र व्यवसाय असून त्यास खास शिक्षणाची आवश्यकता आहे, असें आज मानलें जातें. व्यवस्थापकाची जबाबदारी वेगवेगळ्या प्रकारची असून त्यास आर्थिक जबाबदारीच्या बरोबरच सामाजिक, नैतिक आणि राजकीय जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात.

हा विषय शास्त्रीय आणि सांस्कृतिक मंत्रालयाकडे सोंपविण्यांत आला आहे हें माझ्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें आहे. या विषयांत शास्त्रीय संशोधनास भरपूर वाव आहे हेंच लक्षांत घेऊन हा विषय शिक्षणमंत्र्यांकडे न सोंपवितां या मंत्रालयाकडे सोंपविण्यांत आला असावा असें मला वाटतें.

भारतांत ह्या विषयाच्या शिक्षणास नियोजनपूर्वक सुरुवात करण्यांत आलेली असून वेगवेगळ्या सात संस्था स्थापण्यांत आल्या. त्यांत कांहीं प्रगति झाल्यावर मॅनेजमेंट असोसिएशन स्थापण्यांत आली. भारतांत देण्यांत येणाऱ्या शिक्षणाचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांत व्याख्यानांपेक्षां प्रात्यक्षिक अनुभवावर भर दिला जातो आणि विद्यापीठांतील कोणतीहि पदवी नसली तरी विद्यार्थ्यांना व्यवस्थापकीय विभागाच्या कोणत्याहि शाखेचा अभ्यास करतां येतो. निराळ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास शिक्षणपद्धति लवचिक पद्धतीचें ज्ञान ते विद्यार्थ्यांना देत असतात. हे सर्व शिक्षक व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून काम करतात. सल्लागार या नात्यानें त्यांच्या दृष्टीस येणाऱ्या समस्यांचा ते अभ्यास करून त्याविषयीं ते एकादें पुस्तक प्रसिद्ध करतात.

अमेरिकेंत या विषयांत फारच प्रगति झालेली आहे. तेथील लोकांत या विषयाबद्दल आस्था दिसून येते. या विषयावर नाना प्रकारचे लहानमोठे शिक्षणक्रम तेथें ठिकठिकाणीं आहेत. व्यवस्थापकीय शिक्षणक्रमाखेरीज इतर लहानलहान व्यावसायिक ( vocational ) शिक्षणक्रम देणाऱ्या तेथें ३०० च्या वर संस्था आहेत. त्यांच्यांत संशोधन पुष्कळ प्रमाणावर करण्यांत येतें व या संशोधनाचा उपयोग व्यवस्थापकीय शास्त्राच्या प्रगतीसाठी केला जातो; आणि याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे शिक्षणक्रम शिकविणारी मंडळी आपापल्या क्षेत्रांत जाणकार असून अगदीं अद्यावत् आहेत. शिक्षणाचा खरा हेतु विद्यार्थ्यांना आपल्या व्यवसायांत आपलें कर्तव्य बजावण्यास समर्थ करणें हा होय.

एखाद्या कारखान्याच्या अगर व्यापारी कार्यालयाच्या व्यवस्थेकडे दोन दृष्टींनीं बघतां येईल. एक म्हणजे व्यवस्था पाहतांना कराव्या लागणाऱ्या वेगवेगळ्या कार्यांच्या दृष्टीनें विचार करणें व दुसरी म्हणजे व्यवस्था पाहतांना जे निर्णय घेण्यांत येतात, त्या दृष्टीनें पहाणें. व्यवस्था पाहणें म्हणजे वेळोवेळीं निर्णय घेऊन त्यांना अमलांत आणणें. हे निर्णय आपण कसे घेतों या प्रश्नाला उत्तर शोधूं लागतांच आपण कार्यक्षेत्राच्या (functional) दृष्टिकोनांतून या विषयाकडे पाहणें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें मॅनेजमेंटमध्यें नियोजन ( planning ), सिद्धता ( organization ), सुसूत्रीकरण ( Integration ) आणि मापन ( Measurement ) यांचा समावेश होतो हें आपणांस दिसून येईल. आपल्या दैनंदिन व्यवहारांतलेंच उदाहरण द्यावयाचें तर असें समजा कीं एखाद्यानें एक पानविडीचें दुकान घालावयाचें ठरविलें आहे. दुकान घालणें ह्या निर्णयास आपण नियोजन म्हणूं शकूं. या दुकानाला कोणता माल लागेल, तो कसा आणावयाचा, जागा कोणती घ्यावयाची, दुकान कसें सजवायचें इ. गोष्टींस आपण सिद्धता म्हणूं शकूं; आणि पानें 'क्ष' केव्हां आणून देईल, 'ब' कडून तंबाखू केव्हां आला पाहिजे याविषयींच्या निर्णयास सुसूत्रीकरण म्हणतां येईल आणि मापनांत यापासून एकंदर विक्री किती होईल, फायदा काय होईल इ. समावेश होतो.

व्यवस्था पाहणें म्हणजे कांहीं हुकूम सोडणें नसून त्यांत पुढाकार घेणें ( leadership ) आणि इतरांना कार्यप्रवृत्त करणें यांचा समावेश होतो. केवळ याच दृष्टिकोनांतून आम्ही या विषयाकडे पाहतों आणि हेंच आम्ही शिकवीत असतों.

परंपरागत शिक्षणपद्धतींत विशिष्ट नोकरी विचारांत घेऊन त्या नोकरीला लायक बनविणारें शिक्षण दिलें जात असे. परंतु जेव्हां दुसरें महायुद्ध सुरू झालें तेव्हां जास्तींत जास्त उत्पादनाची आत्यंतिक निकड तीव्रतेनें भासूं लागली; पण केवळ हुकूम सोडून कांहीं जास्त माल पैदा होऊ शकत नव्हता. याच वेळीं ज्यांना सध्यां 'बिहेविअरल सायन्सेस' म्हणतात, त्यांचें माणसाला कार्यप्रवृत्त करण्यांत असलेलें महत्त्व पटूं लागलें. या शास्त्रांच्या आधारें व्यक्तीस एखादें कार्य करण्यास प्रवृत्त करतां येतें असें प्रकर्षानें दिसून आलें. जीं राष्ट्रें जास्तींत जास्त पुरवठा निर्माण करूं शकतील त्यांचा विजय होईल असें सर्वांना दुसऱ्या महायुद्धांत कळून चुकलें. म्हणूनच जास्तींत जास्त उत्पादनासाठी व्यवस्थापकीय कार्यावर भर देण्यांत आला.

मॅनेजमेंटचे आपण दोन स्थूल विभाग करूं शकूं. एक म्हणजे उपजत किंवा निसर्गदत्त कर्तृत्व आणि दुसरें म्हणजे शिकवितां येणारा विभाग. निर्णय घेण्याची कला कांहीं शिकवतां येत नाहीं. कारण निर्णय घेतांना ज्ञान आणि सारासार विचारशक्ति यांची सांगड आपण घालत असतो. फार तर आपण ज्ञान देऊन निर्णय घेण्याच्या प्रवृत्तींत वाढ करूं शकतों.

एकाद्या धंद्यांत अगर व्यवसायांत कच्च्या मालाबरोबरच मानवालाहि बरेंच महत्त्वाचें कार्य करावयाचें असतें. नोकरवर्गाला सुज्ञपणें हाताळावयाचें असतें. त्यांना योग्य मार्गानें कार्यप्रवृत्त करतां येतें.

ज्या ठिकाणीं निर्णय घेण्यास सुरुवात होते तिथूनच मॅनेजमेंटला प्रारंभ होतो. योग्य शिक्षण दिल्याखेरीज कोणालाहि अशा जागीं नेमूं नये.

व्यवस्थापकीय ज्ञान प्राप्त झालेला नोकरवर्ग मिळविण्यासाठी अमेरिकेंतील मोठमोठ्या कंपन्या काय करीत आहेत हें पाहणें उचित होईल. क्रायस्लर कंपनींत लहानमोठे निर्णय घ्यावे लागणारीं १,६०० माणसें आहेत. स्थानिक विद्यापीठांच्या साहाय्यानें नवीन लोकांना जरूर तो व्यवस्थापकीय शिक्षणक्रम देण्याची योजना कंपनीनेंच आंखलेली आहे. कांहीं ठिकाणीं

थोडा काळ शिक्षण घेऊन त्याचा प्रत्यक्षांत उपयोग करून परत शिक्षणक्रम सुरू करणें अशी पद्धत आहे.

विद्यापीठांतून 'डायरेक्टर ऑफ प्लेसमेंट' म्हणून एक अधिकारी असतो. हा विद्यार्थीवर्गाला त्यांना सोईस्कर असे कोणते व्यवसाय आहेत याचें मार्गदर्शन करीत असतो. मोठमोठ्या कंपन्यांतील 'परसोनेल मॅनेजर' कंपनीच्या गरजा विद्यापीठांतील अधिकाऱ्यांस कळवितात. हे अधिकारी लायक विद्यार्थ्यांची व परसोनेल मॅनेजरची मुलाखत घडवून आणतात, आणि जर कोणी पसंतीस उतरले तर त्यांना पदवी मिळावयाच्या अगोदरच कामावर घेतात. यामागील हेतु हा कीं त्यांना त्यांच्या नोकरीच्या कारखान्यांतील परिस्थितीचा आणि कामाचा पूर्वपरिचय असावा.

## रांची येथील भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना

कोणत्याहि देशाच्या औद्योगीकरणाचा पाया म्हणजे कोळसा, लोखंड-पोलाद आणि वीजनिर्मितीचीं केंद्रें, ह्या त्रिविध प्रकारचे कारखाने होत. जो देश ह्या बाबतींत स्वयंपूर्ण असतो त्या देशाला आपलें औद्योगीकरण स्वतःच्याच साधनसामुग्रींतून साधणें अवघड जात नाहीं. तथापि, औद्योगीकरणासाठी लागणारी भारी वजनाची यंत्रसामुग्रीहि देशांत करतां आली नाहीं तर परदेशांवर अवलंबून राहावयाची पाळी येणें अपरिहार्य असतें. ह्या दृष्टीनें पाहतां रांची येथें रशिआच्या मदतीनें काढण्यांत यावयाच्या भारी यंत्रसामुग्रीच्या प्रचंड कारखान्याला पोलादाच्या कारखान्याच्या खालोखाल महत्त्व आहे. बिहारमध्यें रांची येथें काढण्यांत यावयाच्या ह्या कारखान्याची तपशीलवार योजना रशिअन तज्ज्ञांकडून आलेली आहे. त्याचप्रमाणें संकल्पित कारखान्यांत करावयाच्या उत्पादनासंबंधीं भारत सरकारला सल्ला देण्यासाठी सहा रशिअन तज्ज्ञांचें एक मंडळहि भारतांत येऊन दाखल झालें आहे. भारत सरकारच्या व्यापार व उद्योगखात्यातर्फे हिंदी तज्ज्ञांची एक कमिटी स्थापन करण्यांत आलेली आहे. रशिआच्या तज्ज्ञ-कमिटीशीं कारखान्याबाबत चर्चा करून सूचना करण्याची कामगिरी हिंदी तज्ज्ञ करणार आहेत. उभयता तज्ज्ञ-कमिट्या सांगोपांग चर्चा करतील व मग कारखान्याच्या उभारणीसाठी जरूर ते निर्णय घेण्यांत येतील. प्रथम ह्या कारखान्याची उभारणी दोन टप्प्यांत करण्याचें घाटत होतें आणि रशिअन तज्ज्ञांकडून आलेला अहवाल ह्याच दृष्टीनें तयार करण्यांत आला होता. परंतु आतां सरकारनें सर्वच कारखाना एका टप्प्यांत करण्याचें ठरविलें असल्यानें योजनेंत कांहीं बदल होणें अपरिहार्य आहे.

कारखान्याच्या मूळच्या योजनेप्रमाणें पहिला टप्पा पूर्ण करण्यांत येता, तर दरसाल ४५,००० टन वजनाची भारी यंत्रसामुग्री तयार होऊं शकली असती. ह्या पहिल्या टप्प्याला ४२ कोटी रुपये खर्च आला असता. दुसऱ्या टप्प्याला ५१ कोटी रु. खर्च आला असता व तो पूर्ण झाल्यावर दरसाल ८०,००० टन वजनाची यंत्रसामुग्री कारखान्यांत तयार होऊं लागली असती. आतां दोन्ही टप्पे एकदम एकाच दमांत पूर्ण करण्याचें ठरविण्यांत आल्यामुळें कारखान्याच्या खर्चासंबंधीं नवीन अंदाज तयार करावे लागतील. १९५७ सालीं रशिआनें भारताला ६० कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे. त्यापैकी कांहीं कर्जाचा उपयोग ह्या कारखान्यासाठी करण्यांत येणार आहे. त्याशिवाय सरदार स्वर्णसिंग ह्यांनीं लोकसभेंत सांगितलेल्या माहितीप्रमाणें रशिआकडून आणखी १८० कोटी रु. रकमेचें कर्ज मिळणार आहे. ह्या कर्जातूनहि कांहीं रक्कम कारखान्याच्या उभारणीसाठी वापरण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीच्या मुख्य कामाबरोबरच आनुषंगिक कामें करणें आवश्यक आहे. पाण्याचा पुरवठा, यंत्रसामुग्रीची आयात, हिंदी तज्ज्ञांना शिकवून तयार करण्याची सोय, इत्यादि बाबतींतहि रशिअन तज्ज्ञ हिंदी तज्ज्ञांशीं विचारविनिमय करणार आहेत. रशिआच्या वर्चस्वाखालील राष्ट्रगटांतील देशांतहि हिंदी तज्ज्ञ शिकवून तयार करतां येतील. त्याप्रमाणें झेकोस्लोव्हाकिआनें हिंदी तज्ज्ञांना आपल्या कारखान्यांत शैक्षणिक सवलती देण्याचें कबूलहि केलें आहे. रांची येथील कारखान्यांत पोलादाच्या कारखान्यांना लागणाऱ्या भट्ट्या, मोठमोठ्या भारी यान्त्रा, लोखंड वितळविण्याचें व गाळण्याचें साहित्य, इत्यादि सामुग्री तयार करण्यांत येणार आहे. मूलभूत स्वरूपाच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री तयार करण्यांत येणार असल्यामुळें ह्या कारखान्याचें महत्त्व असाधारण आहे.

## लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें दिलेले क्लेम्स

लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशननें १९५८ मध्यें क्लेम्सदाखल २३.७० कोटी रुपये दिले. त्यांपैकी विमेदारांच्या निधनामुळें एकूण ६.३४ कोटी रुपये देण्यांत आले.

### शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींची वर्गवारी

( खात्यांची संख्या लक्षांचे आंकड्यांत; रकमा कोटी रु. चे आंकड्यांत; कंसांतील आंकडे एकूणशीं % )

| अखेर | एकूण | | डिमांड | | सेव्हिंग | | टाइम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | खातीं | रक्कम | खातीं | रक्कम | खातीं | रक्कम | खातीं | रक्कम |
| १९५५ ... ... | ३७.२ | ९९३.६५ | १०.२ | ४९७.०३ (५०.०) | २२.७ | १६२.५३ (१६.४) | ४.३ | ३३४.०९ (३३.६) |
| १९५६ ... ... | ४०.२ | १०७४.८१ | १०.८ | ५२२.२१ (४८.६) | २४.६ | १८३.६५ (१७.१) | ४.८ | ३६८.९५ (३४.३) |
| १९५७ ... ... | ४३.९ | १३४७.६१ | १०.६ | ५६६.२५ (४२.०) | २७.४ | २०१.९८ (१५.०) | ५.९ | ५७९.३८ (४३.९) |
| १९५८ ... ... | ४८.७ | १५४१.३३ | ११.२ | ५५०.९३ (३५.७) | ३०.३ | २२१.९७ (१४.४) | ७.२ | ७६८.४३ (४९.९) |
| १९५५ चे मानानें % वाढ | ३०.९ | ५५.१ | ९.८ | १०.८ | ३३.५ | ३६.६ | ६७.४ | १३०.० |

# मुंबई राज्याची दुसरी पंचवार्षिक योजना

## झालेलें कार्य व पुढील कार्याची दिशा

राज्यपुनर्रचनेनंतर निर्माण झालेल्या प्रासंगिक अडचणींवर मात केल्यानंतर, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखालील विकासाच्या विस्तृत कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई राज्य हें सध्यां योग्य प्रकारें सिद्ध असून तें, एकूण ३५०·२८ कोटी रकमेच्या खर्चाची दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची पूर्ण अंमलबजावणी आत्मविश्वासानें करीत आहे.

योजनेंतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षांत अनुक्रमें रु. ६६·२० कोटी, रु. ७३·४३ कोटी व रु. ७६·७७ कोटी रकमेची तरतूद करण्यांत आली असून १९५९–६० सालीं रु. ९०·१८ कोटींची तरतूद करण्यांत आली आहे. यावरून दरवर्षी खर्चाच्या रकमेंत कशी वाढ झाली हें दिसून येतें. राज्यपुनर्रचनेमुळें निर्माण झालेल्या प्रशासकीय अडचणी व परदेशी चलनामुळें अंशतः निर्माण झालेल्या अडचणी, लोखंड व पोलाद यांसारख्या प्रमुख वस्तूंचा व प्रशिक्षित इसमांचा तुटवडा, यानुळें योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत अनुक्रमें रु. ४६·९३ कोटी व रु. ५१·२१ कोटी रक्कम खर्च करण्यांत आली.

### पुनर्रचनेच्या अडचणी

तसेंच, सुरुवातीच्या योजना मंजूर करणें, नोकरवर्गाची भरती करणें, साधनसामग्री खरेदी करणें व निरनिराळ्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य प्रकारची प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणें, याबाबतची प्रारंभिक उपाययोजना करण्यांत यावयाची होती, हेंहि नमूद करतां येईल. सुरुवातीच्या वर्षीं खर्चांत जी कमतरता दिसून आली याचीं कारणें वरीलच होत.

### योजनांचें एकसूत्रीकरण

राज्यांतील नियोजनकारांना, नवीन मुंबई राज्यांत समाविष्ट होणाऱ्या निरनिराळ्या घटक प्रदेशांतील विविध योजनांचें एकसूत्रीकरण करण्याचें प्रचंड कार्य करावें लागलें व नवीन राज्याची एकसंघ योजना म्हणून समोर मांडावी लागली. योजनेंत समाविष्ट केलेल्या घटक प्रदेशांतील अनेक परियोजनांची माहिती योजनेच्या आराखड्यांत देण्यांत आली आहे. त्या योजनांचें योग्य प्रकारें संशोधन व विस्तृत पाहणी केल्यावर, नियोजनकारांना त्या योजना तयार कराव्या लागल्या. योजनेच्या दुसऱ्या वर्षाच्या नंतरच्या सहामाहींत व तिसऱ्या वर्षीं योजना तयार करण्याची व त्यांची अंमलबजावणी करण्याची गति वाढविण्यासाठी निरनिराळे उपाय योजल्यानंतर, मुंबई राज्य हें सध्यां योजनेचा संपूर्ण कार्यक्रम जलद गतीनें पार पाडण्यास समर्थ आहे.

### अग्रप्राधान्य

उलटलेल्या दोन वर्षांचा, विशेषतः १९५९–६० या वर्षाचा कार्यक्रम तयार करतांना पहिल्या तीन वर्षांत चालू असलेल्या योजनांचीं कामें जलद गतीनें पूर्ण करण्याचा प्रयत्न झाल्यास त्यापासून फायदे मिळवितां येतील याकडेहि लक्ष देण्यांत आलें आहे. तसेंच पूर्ण झालेले पाटबंधारे व वीज यांपासून मिळणाऱ्या फायद्यांच्या योजनांना अग्रप्राधान्य देण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें सेंद्रिय व हिरवीं खतें, छोटे पाटबंधारे, सुधारलेल्या बियाण्यांचा पुरवठा, कर्जे व क्रयविक्रय सहकारी संस्था, खेडेगांवांतील स्थानिक संस्थांची स्थापना, इत्यादींच्या विकासाकडे खास लक्ष देण्यांत आलें आहे.

तसेंच शेतीउत्पादनाच्या विकासविषयक कार्यक्रमावर खास भर देण्यांत आलेला आहे. प्रशिक्षण योजनांसाठी विशेषतः तांत्रिक शिक्षणासाठी पुरेशी तरतूद करण्यांत आली आहे. राज्यांतील सर्व प्रदेशांचा समतोल विकास साधण्याच्या दृष्टीनें ज्या प्रदेशाची एकूण प्रगति मंद व ठरविलेल्या इष्टांकापेक्षा कमी असेल त्या प्रदेशाच्या विकासाच्या दृष्टीनें पुरेशा तरतुदी करण्यांत आल्या आहेत. कांहीं योजनांचा राज्य योजनेंत अंतर्भाव करण्यांत आला आहे. त्याशिवाय मध्यवर्ती सरकारनें पुरस्कार केलेल्या कित्येक योजना राज्य सरकारतर्फे कार्यान्वित करण्यांत येत आहेत व अशा योजनांसाठी लागणारा खर्च, पूर्णतः किंवा अंशतः मध्यवर्ती सरकारकडून, करण्यांत येत आहे. त्यामध्यें राष्ट्रीय हमरस्ते, मध्यवर्ती रस्तेनिधींतून साहाय्य करण्यांत येणारीं रस्तेबांधणीचीं कामें, निर्वासित इसमांचें पुनर्वसन, राष्ट्रीय पाणीपुरवठा व स्वच्छता, तांत्रिक प्रशिक्षणाकरितां खास योजना, वस्तींचें उच्चाटन व बहुमुखी विकास योजना, यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. राज्याला खर्चाचा वांटा उचलावा लागतो अशा बाबतींत, १९५९–६० या वर्षांतील ९०·१८ कोटी रुपये खर्चाच्या कार्यक्रमांत राज्य सरकारनें खर्चाचा वांटा उचलला आहे. केंद्र सरकारनें पुरस्कार केलेल्या योजनांकरितां लागणाऱ्या खर्चाच्या बाबतींत मध्यवर्ती सरकारनें करावयाचा खर्च ८ कोटी रुपये इतका राहील असा अंदाज आहे.

### कृषिविषयक कार्यक्रम

पाटबंधारे, जमीन–विकास, खतें, रासायनिक खतें, सुधारलेलें बीं, झाडांचें संरक्षण व शेतीची सुधारलेली पद्धति या निरनिराळ्या उपाययोजना अंमलांत आणून अन्नोत्पादन १२·७८ लक्ष टनांनीं वाढविण्याचा मुंबई सरकारच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश आहे. १९५८–५९ या सालाच्या अखेर अन्नोत्पादन ३·३६ लक्ष टनांनीं वाढेल असा अंदाज आहे. १९५६–५७ या वर्षीं अन्नधान्याचें उत्पादन ७०·७५ लक्ष टन होतें. शेतीउत्पादनाच्या निरनिराळ्या योजना कार्यान्वित करण्यांत आल्यामुळें १९५९–६० या वर्षांत हें उत्पादन ७६·६७ लक्ष टनांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. १९५९–६० या वर्षांत हा कार्यक्रम द्रुतगतीनें कार्यान्वित करण्यांत आला आणि पाटबंधाऱ्यांच्या अधिकाधिक सोयी उपलब्ध करण्यांत आल्यामुळें आणि जास्त सीड–फार्मस् स्थापन करण्यांत आल्यामुळें १९५९-६० या वर्षाच्या अखेरीस ५·९२ लक्ष टन इतकें जास्तीचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. लहान प्रमाणावरील सहकारी संस्था स्थापन करण्यासंबंधाच्या नवीन धोरणामुळें व सेवा सहकारी संस्थाची वाढ करण्यांत येत असल्यामुळें शेतीविषयक कार्यक्रमास आणखी जोराची चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

१९५८–५९ या वर्षापासून निरनिराळ्या उपाययोजनांची अंमलबजावणी करून सर्वांगीण प्रयत्न करण्यांत येत आहेत. ३५,००० नवीन विहिरींचें बांधकाम करून पाणीपुरवठा करणें, एकूण राज्यांत २८,००० जुन्या विहिरींची दुरुस्ती, भूसंरक्षण योजनेखालीं जास्त जमीन आणणें व शेतकऱ्यांना कर्जासंबंधीच्या अधिक चांगल्या सोयी उपलब्ध करून देणें अशा उपाययोजनांचा त्यांत समावेश होतो. शेतकरी पाटबंधाऱ्यांच्या योजनांमुळें मिळणाऱ्या पाण्याचा उपयोग करतात कीं नाहीं याची पाहणी करण्याकरितां एक पाणीविनियोग समिति स्थापन करण्यांत आली आहे.

योजनेच्या अखेरपर्यंत ३२३ सीड फार्मस् तयार करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें. त्यापैकी १९५८-५९ या वर्षात २३० सीड फार्मस् तयार करण्यांत आले आहेत. १९५९-६० या वर्षात आणखी ९३ सीड फार्मस् तयार करण्याचा विचार आहे. १९५८-५९ या वर्षात ११,४०० नवीन विहिरी बांधण्याचें व ४,००० विहिरी दुरुस्त करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें. १९५९-६० या वर्षात ८,००० नवीन विहिरी बांधण्याचें व १०,००० जुन्या विहिरी दुरुस्त करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें आहे. १९५७-५८ या वर्षात अंदाजें १६·५२ लक्ष टन कंपोस्ट खत तयार करण्यांत आलें. १९५९-६० या वर्षात अंदाजें ४·२७ लक्ष टन खत तयार करून त्याचें वांटप करण्याचें ठरलें आहे हें खत बहुशीं शहरी कंपोस्ट खत राहील. तसेंच शेतकऱ्यांना ८०·८७ टन रासानिक खताचाहि पुरवठा करण्यांत येईल. १९५९-६० या वर्षाच्या अखेरपर्यंत मोठ्या व लहान पाटबंधाऱ्यांच्या योजनेखालीं आणखी अंदाजें २·१८ लक्ष एकर जमीन आणण्यांत येईल. १९५८-५९ या वर्षाच्या अखेरपर्यंत पाटबंधाऱ्यांच्या योजनेखाली १·४४ लक्ष एकर जमीन आणण्यांत आली आहे.

### जमीनसंरक्षण व बांध

पहिल्या योजनेच्या काळांत राज्यामध्यें, बांध घालून जमीन संरक्षण करण्याचा एक व्यापक कार्यक्रम हातीं घेण्यांत आला होता. हीं कामें मुख्यतः दुष्काळी कामें म्हणून करण्यांत आलीं होतीं. दुसऱ्या योजनेंत, राज्य-पुनर्रचना करण्यांत आलेल्या राज्यामध्यें ४७६·६७ लक्ष रु. च्या एकूण तरतुदींचा समावेश करण्यांत आला. अन्नधान्योत्पादनांत वाढ करण्याच्या दृष्टीनें राज्य सरकारनें जमीनसंरक्षणविषयक कार्यक्रमावर खास भर दिला असून त्यासाठी योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत या बाबतच्या कार्यक्रमावर एकूण १४३·८१ लक्ष रुपये खर्च झाले असून १९५८-५९ सालीं १६८·८३ लक्ष रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. अशा रीतीनें १९५९ च्या मार्चअखेरपर्यंत ३१२·६४ लाख रुपये खर्च झाले असून उरलेल्या दोन वर्षांत १६४·०३ लाख रुपये खर्च होतील. मुंबई सरकारनें जमीन-संरक्षणविषयक कार्यक्रमाला अग्रक्रम दिला असल्यामुळें १९५९-६० सालासाठी ३०६·६८ लाख रुपये खर्चाचा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे.

---

### ठेवींची बँकवार वांटणी
( कोटी रु. कंसांतील आंकडे एकूणशीं प्रमाण % )

| अखेर | प्रमुख हिंदी शेड्यूल्ड बँका | विदेशी शेड्यूल्ड बँका | इतर हिंदी शेड्यूल्ड बँका | एकूण |
|---|---|---|---|---|
| १९५५ ... | ६१९·४४ (६२·३) | १८८·९७ (१९·०) | १८५·२५ (१८·६) | ९९३·६६ |
| १९५६ ... | ६७८·६१ (६३·१) | १८५·०५ (१७·२) | २११·१५ (१९·७) | १०७४·८१ |
| १९५७ ... | ८७६·१९ (६५·०) | २०५·३८ (१५·२) | २६६·०४ (१९·८) | १३४७·६१ |
| १९५८ ... | १०३०·८१ (६६·९) | १९५·५० (१२·७) | ३१५·०२ (२०·४) | १५४१·३३ |

**अणुविज्ञानाच्या संशोधनासाठी मदत**—अणुशक्तीचा शांततामय कार्यासाठी उपयोग करण्यासाठी एक संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या कामीं रशिया इराकला मदत करणार आहे. संशोधन करण्यासाठी लागणारी अणुभट्टी उभारण्याचें काम रशिअन तंत्रज्ञच करणार आहेत. त्याशिवाय अणु-विज्ञानाच्या शास्त्रांचें इराकी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचें कामहि रशियन प्राध्यापक करणार आहेत.

**सीलोनमधील आयुर्वेदाची पुनर्घटना**—सीलोनमधील आयुर्वेद औषधपद्धतीची पुनर्घटना करण्यासाठी सरकारनें शिवशर्मा ह्या नांवाच्या एका भारतीयाची नेमणूक केली आहे. ह्या नेमणुकीविरुद्ध सीलोनच्या प्रतिनिधि-गृहांतील विरोधी पक्षांनीं टीका केली होती, परंतु सीलोनचे पंतप्रधान श्री. बंदरनायके ह्यांनीं शिवशर्मा ह्यांच्या नेमणुकीचें समर्थन केलें आहे.

**कांडला बंदरांत रेडारची व्यवस्था**—कांडला बंदरांत रेडारची यंत्रसामग्री बसविण्यांत आली आहे. तिचा उपयोग करण्यास लवकरच सुरुवात करण्यांत येईल. ह्या यंत्रसामग्रीच्या साह्यानें बंदराच्या आसपासच्या ३० मैलांच्या परिसरांत असणाऱ्या बोटींचा ठावठिकाणा अचूकपणें लागूं शकेल. बंदरांतील बोटींची वाहतूक नियंत्रित करणें त्यामुळें सोपें होईल.

**आरामशीर प्रवासाची सोय**—अमृतसर ते चंडीगढ ह्या मोटारमार्गावर आरामशीर प्रवास घडविणारी वाहतूक सुरू करण्यांत आली आहे. ह्या गाड्यांत हवामान सुखद राखण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. नेहमीं ये-जा करणाऱ्या प्रवासी मोटारगाड्या शिवाय चालू आहेतच. प्रवाशांच्या सुखसोयींत त्यामुळें चांगली भर पडली आहे.

**वीजनिर्मितीचा प्रयोग फसला**—दिल्लीपासून तीन मैलांवर असलेल्या खामापूर ह्या गांवीं बैलाच्या शक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याचा प्रयोग करण्यांत येत होता. पण तो अयशस्वी झाला आहे. अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशनच्या मदतीनें ह्या कामासाठी लागणारी यंत्रसामग्री अमेरिकेंत मुद्दाम बनवून घेण्यांत आली होती. खेड्यांतील विजेच्या पुरवठ्याचा प्रश्न ह्या प्रयोगाच्या यशानें सुटेल असें वाटत होतें.

**दोन हृदयांचा कुत्रा**—रशिअन वैद्यकीय शास्त्रज्ञांनीं एका कुत्र्याच्या शरीरांत नवें हृदय बसवून ह्या दोन हृदयें असणाऱ्या कुत्र्याला ३० दिवसांपर्यंत जिवंत ठेवण्यांत यश मिळविलें. नंतर मात्र कुत्रा न्यूमोनिआ होऊन मरण पावला. जादा हृदय बसविण्याचा प्रयोग यशस्वी झाला तर हृदयविकार असणाऱ्या माणसांचें आयुष्य वाढवितां येईल असा त्यांचा दावा आहे.

**चहाच्या मळ्यावरील कामगार**—पश्चिम बंगाल सरकारनें चहाच्या मळ्यांत काम करणाऱ्या कामगारांचें रोजचें किमान वेतन १२ नया पैशांनीं वाढविलें आहे. ही वाढ १ जुलैपासून देण्यांत येणार आहे. चहाच्या कामगारांनीं वेतनवाढीसाठी संपावर जाण्याचा पुकारा केला होता. उत्तर बंगालमधील दोन लाख कामगारांना वाढीचा फायदा मिळेल.

**लिपझिग येथील औद्योगिक प्रदर्शन**—पूर्व जर्मनींत लिपझिग येथें ३० ऑगस्ट ते सप्टेंबरपर्यंत एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येत आहे. ह्या प्रदर्शनांत निरनिराळ्या ५० देशांच्या १०,००० कंपन्यांनीं भाग घेण्याचें ठरविलें आहे. भारतामधून १८ जणांचें सरकारी मंडळ प्रदर्शन पहाण्यासाठी जाणार आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.